अतितात्काळ/कालमर्यादा

**क्र.पोमसं/२/१०(५)/स.सा.बदल्या-२०१७/१४/२०१७**
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१
दिनांक : 03 /०२/२०१७

**संदर्भ :-** १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/३/३१६३/विशेष शाखा सेवा/६०६/०६, दिनांक २/१२/२००६, व
२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश क्र.३/२०१४, दिनांक ०१/०२/२०१४

**विषय :-** **सर्वसाधारण बदल्या - २०१७ :**
पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त

*****

संदर्भाधिन परिपत्रकांमधील सूचनांच्या, तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश क्र.३/२०१४, दिनांक ०१/०२/२०१४ मधील तरतुदींच्या अधिन राहून सन-२०१७ साठी पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त दर्जाच्या सर्व संवर्गातील अधिका-यांच्या वार्षिक सर्वसाधारण बदल्या करण्याचे प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने :-

१. सध्याच्या नेमणुकीच्या पदात **दि.३१/०५/२०१७ पर्यंत २ वर्षे पूर्ण करणार आहेत,** अशा पोलीस उप अधीक्षकांकडून बदलीकरिता त्यांच्या पसंतीच्या ठिकाणांची माहिती घेऊन सोबत जोडलेल्या प्रपत्रात भरुन संबंधीत घटक प्रमुखांनी ती निश्चितपणे दि. ०१/०३/२०१७ पुर्वी या कार्यालयास पाठवावी.

२. अधिका-यांची माहिती प्रपत्रात भरतांना ती संबंधीतांच्या सेवापुस्तकांतील प्रमाणित नोंदींनुसार बरोबर असल्याची निश्चीत खात्री करावी.

३. प्रत्येक अधिका-यासाठी प्रपत्राचे स्वतंत्र पृष्ठ वापरण्यात यावे.

४. बदलीकरिता पसंतीची ठिकाणे कळविताना खालील ठिकाणे वगळण्याविषयी संबंधीत अधिकाऱ्यांना कृपया सूचना द्याव्यात :

(i) घोषित मूळ जिल्हा

(ii) ज्या जिल्ह्यात त्यांची, अथवा त्यांच्या निकटच्या कुटुंबियांची स्थावर मालमत्ता, किंवा पारिवारिक व्यवसाय आहे,

(iii) जेथे त्यांची पूर्वी प्रचलित शासन नियमांनुसार सेवा पूर्ण झाली आहे,

५. तसेच, संबंधीतांना स्पष्ट कल्पना द्यावी की, पसंतीच्या ठिकाणी प्रशासकीयदृष्ट्या शक्य असेल तरच बदली करण्याकरिता दिलेल्या विकल्पांचा विचार करण्यात येईल.

६. (i) सार्वत्रिक बदल्या, २०१७ नंतर पुढील वर्षाच्या सर्वसाधारण बदल्यांपर्यंत अत्यंत अपवादात्मक परिस्थिती असल्याखेरीज **मुदतपूर्व विनंतीचा विचार केला जाणार नाही, ही बाब** संबंधीत पोलीस अधिका-यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

(ii) त्यानुसार बदलीसंदर्भात ज्यांचे विनंती अर्ज सादर `लेले आहेत, असे अर्ज अर्जदारांनी विनंतीमध्ये नमूद केलेल्या बाबी ख-या आहेत किंवा कसे, याबाबत स्पष्ट अभिप्राय नमूद करुन सोबतच्या विवरणपत्रात भरुन पाठवावेत.

७. सोबत जोडलेल्या प्रपत्रात परिपूर्ण माहिती भरुन दिनांक १५/०३/२०१७ पर्यंत या कार्यालयास अहवाल प्राप्त न झाल्यास पसंतीच्या ठिकाणांविषयी काहीही माहिती द्यावयाची नाही, असे गृहित धरुन बदलीसाठी पात्र असलेल्या संबंधीत अधिका-यांची प्रशासकीयदृष्ट्या शक्य असेल तेथे बदली करण्यात येईल, व माहिती न पाठविल्याची जबाबदारी घटक प्रमुखांवर राहील.

८. पोलीस उप अधीक्षकांनी बदल्यांसंदर्भातील त्यांचे विनंती अर्ज त्यांच्या घटक प्रमुखांमार्फतीनेच ह्या कार्यालयात सादर करावेत, आणि घटक प्रमुखांनी देखील सदर अर्ज ह्या कार्यालयात सादर करतांना संबंधीत अधिकाऱ्याच्या बदल्यांसंदर्भात त्यांचे **स्पष्ट कार्यालयीन अभिप्राय, व त्यांचा सेवापुस्तकातील अधिकृत अणि अचूक संपूर्ण सेवातपशील** न चुकता पाठवावा.

९. घटक प्रमुखांना अशीही विनंती करण्यात येते की, आयुक्तालयांतर्गत सहायक पोलीस आयुक्तांच्या बदल्या परस्पर करु नयेत. अशा बदल्या केल्यास पुढे काही न्यायालयीन बाबी निर्माण झाल्या तर त्याची संपूर्णत: जबाबदारी संबंधीत घटकप्रमुखांची राहील, याची देखील संबंधीत घटकप्रमुखांनी काळजीपूर्वक नोंद घ्यावी.

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे

GT२०१७

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथकें, मुंबई /लोहमार्ग, मुंबई/रा.रा.पो.बल, मुंबई/ वाहतूक, मुंबई /दहशतवाद विरोधी पथक, मुंबई /कारागृह महानिरीक्षक, कार्यालय, पुणे

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबई सह व बृहन्मुंबई वगळून)

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/ महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे

संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक /नक्षल विरोधी अभियान, नागपूर/ वि.सु.वि., दादर, मुंबई/फोर्स वन, मुंबई / नागरी हक्क संरक्षण, म.रा., मुंबई

विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे

संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर

सर्व पोलीस अक्षीक्षक (लोहमार्ग /विसुवि, दादर सह )

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १६

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये./ अ.अ.प्र.क्रे., नागपूर

उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण विद्यालय, नाशिक

पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरीता सस्नेह अग्रेषित :-

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे/ ठाणे/ नाशिक/औरंगाबाद/नंदूरबार/गडचिरोली/अमरावती/नागपूर

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई.

२. सदरचे परिपत्रकीय व ज्ञापन *http://www.mahapolice.gov.in* या संकेतस्थळावर पुढील ३० दिवसांसाठी FLASH या शिर्षाखाली सत्वर प्रसिध्द करावेत.

## पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त संवर्गातील अधिका-यांच्या सर्वसाधारण बदल्या -२०१७

१)नांव :- २) सध्याची नेमणूक व दिनांक :-

३) घटक :- ४) प्रवर्ग :- (खुला/ इ.मा.व/अ.जाती/अ.जमाती / वि.जा-अ/भ.ज-ब/ भ.ज-क/ भ.ज-ड/वि.मा.प्र.)

५) घोषित मूळ जिल्हा :- ६) सेवानिवृत्तीचा दिनांक :-

७-१) नेमणुकीचा प्रकार : सरळसेवा / खात्यांतर्गत सरळसेवा/ स्थानापन्न

७-२) पोलीस उप अधीक्षकपदी नेमणुकीची तारीख

| ८) पूर्वीच्या नेमणुका (परिपूर्ण व अचूक) | | | ९) पसंतीची तीन ठिकाणे व विनंती अर्जाची माहिती | घटक प्रमुखांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| घटक | कालावधी | | | |
| | पासून | पर्यंत | | |
| पोलीस उप निरीक्षक<br><br>पोलीस निरीक्षक<br><br>पो उप अ/ सहा पो आ<br><br>** कोणतीही प्राथमिक/ विभागीय चौकशी अथवा शिक्षा प्रलंबित/ प्रस्तावित अथवा चालू आहे काय? (असल्यास तपशील द्यावा.)<br><br>विशेष शाखा नेमणुका संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकाप्रमाणे गणण्यात याव्यात. वि.शा. बाबतच्या नोंदी Bold Font ने दाखवाव्यात | | | (अर्जदाराची स्वाक्षरी) | (घटक प्रमुखाची स्वाक्षरी) |